

एक बटाटा
दोन बटाटे

लेखिका: सिंथिया डेफेलिस

चित्रे: अँड्री उरेन

श्रीयुत आणि श्रीमती *ग्रेडी* हे जोडपे खूप गरीब आहे. त्यांना सगळ्या गोष्टी – एक बटाटा, एक खुर्ची, अनेक भोके असलेली घोंगडी आणि एक जुनाट कोट जो ते आलटून पालटून अंगावर घालतात - दोघांमध्ये वाटून घ्याव्या लागतात. त्यांच्याकडे एकच मेणबत्ती आहे. त्यांच्या गादीखाली त्यांनी एक सोन्याचे नाणे ठेवले आहे. अडचणीच्या काळात ते हे नाणे वापरणार आहेत.

आपल्याला एक मित्र असावा अशी त्यांची तीव्र इच्छा आहे....एकदा त्यांच्या बागेतून ते बटाटा काढत असतात. त्यावेळी श्रीयुत ग्रेडी यांना एक विशाल काळे भांडे सापडते. हे भांडे साधेसुधे नसते. त्यात काही टाकले की ते दुप्पट होते. काय करणार होते ते या भांड्याचे?

एक बटाटा दोन बटाटे

मराठी अनुवाद: सुशील मेन्सन





श्रीयुत आणि श्रीमती *ग्रेडी* हे जोडपे एका खडकाळ आणि ओसाड टेकडीवर एकटेच राहात होते. फार वर्षांपूर्वीच त्यांची मुले मोठी झाली होती आणि आपले नशीब अजमावण्यासाठी बाहेरच्या मोठ्या जगात गेली होती. पण ग्रेडी जोडपे टेकडीवरच्या आपल्या टुमदार घरातच राहिले. त्यांच्या घरात फार कमी वस्तू होत्या. ग्रेडी पती-पत्नी सर्व गोष्टी एकमेकांमध्ये वाटून घेत असत.

ग्रेडी जोडपे खूप गरीब होते. ते आपल्या छोट्याशा बागेतून दररोज एक बटाटा खणून काढत. त्यातूनच त्यांचा नाश्ता, दुपारचे जेवण आणि रात्रीचे जेवण भागत असे. यासाठी ते स्वतःला नशीबवान समजत.

ग्रेडी पती-पत्नी अंगापिंडाने अगदीच हाडकुळे होते. त्यामुळे भोजन करताना ते एकाच खुर्चीवर परस्परांलगत बसू शकत. त्यांच्याकडे एकच खुर्ची असल्यामुळे हे तसं बरंच होतं म्हणायचं.

श्रीमती ग्रेडी यांच्याकडे केसांची एकच पिन होती. त्यांच्याकडे बरीच भोके पडलेली एक घोंगडी आणि एक जुनाट कोट होता. हिवाळ्यात ते हा कोट आलटून-पालटून घालत.

त्यांच्याकडे एकच मेणबत्ती होती. ते तिला कधी पेटवत नसत. दर संध्याकाळी, सूर्यास्त झाल्यावर, काळोख पसरल्यावर, श्रीमती ग्रेडी मेणबत्ती पेटवण्याचे नाटक करत असत आणि दर सकाळी, सूर्योदय झाल्यावर, उजेड पसरल्यावर, त्या मेणबत्ती विझवण्याचे नाटक करत असत.

त्यांच्याकडे एक सोन्याचे नाणे होते. हे नाणे ते अडचणीच्या काळात वापरणार होते. नाणे त्यांनी गादीखाली जपून ठेवले होते.

श्रीयुत ग्रेडी एक चांगले पती होते. ते श्रीमती ग्रेडीला अनुरूप होते. पण आपल्याला एक मित्र असावा, अशी श्रीमती ग्रेडी यांची तीव्र इच्छा होती. या मित्राशी त्या उकडलेल्या बटाट्यांच्या पाककृती आणि जुन्या गोड आठवणी वाटू शकल्या असत्या. आपल्या नवजात बाळांच्या नाजुक डोक्यावरील मऊशार केसांना स्पर्श केल्यावर कसे वाटायचे, हे त्या सांगू शकली असत्या. श्रीमती ग्रेडी अतिशय सुस्वभावी होत्या. त्य श्रीयुत ग्रेडी यांना अनुरूप होत्या. पण आपल्याला एक मित्र असावा, अशी श्रीयुत ग्रेडी यांचीही तीव्र इच्छा होती. या मित्राशी ते बटाट्यांच्या पिकांवर पडणाऱ्या रोगांबद्दल चर्चा करू शकले असते.

एकदा श्रीयुत ग्रेडी रोजच्यासारखेच भोजनासाठी बटाटा काढायला बागेत खणू लागले. खणत-खणत ते बागेच्या शेवटच्या ओळीतील शेवटच्या बटाट्यापर्यंत आले आणि काळजीत पडले. आणखी एखादा बटाटा मिळेल, या आशेने त्यांनी आणखी थोडे खणले.

काय लागले हाताला? बटाट्यापेक्षा कडक, बटाट्यापेक्षा खूप मोठे, बटाट्यापेक्षा काळे....ते एक भांडे होते! श्रीयुत ग्रेडी चकीत झाले. या छोट्याशा बागेत याआधी असे काही सापडले नव्हते त्यांना. आपल्या पत्नीला हे भांडे दाखवण्यास ते उत्सुक झाले. भांडे दोन्ही हातांनी धरून उचलावे लागणार होते. म्हणून, त्यांनी हातातील बटाटा भांड्यात ठेवला आणि भांडे घेऊन घरी निघाले.

“अगं, ऐकतेस का? लवकर ये इकडे!” त्यांनी पत्नीला बोलावले.

श्रीमती ग्रेडी धावत दारात आल्या. “हे काय घेऊन आलात?” त्यांनी कुतूहलाने विचारले.

“हे भांडं सापडलं बागेत खणताना,” भांडे फरशीवर ठेवत श्रीयुत ग्रेडी म्हणाले.
“बरं, पण हे खूपच मोठं आहे. स्वयंपाकाला उपयोगाचं नाही,” श्रीमती ग्रेडी म्हणाल्या.
“होय खरंय, आपला शेवटचा बटाटा घरी आणण्यापुरताच उपयोग झाला याचा.”
“शेवटचा बटाटा!” श्रीमती ग्रेडी उद्गारल्या. “अरे देवा! आता काय करायचं?” भांड्यातून बटाटा काढण्यासाठी त्या भांड्यावर वाकल्या. असे करताना त्यांच्या केसांतील पिन भांड्यात पडली. त्यांनी त्याकडे लक्ष दिले नाही. पण त्यांना भांड्यामध्ये दोन बटाटे दिसले. त्यांनी बटाटे बाहेर काढले. “काय हो, माझी चेष्टा करता काय!” त्या श्रीयुत ग्रेडींना खडसावत म्हणाल्या.

“मी कुठे चेष्टा केली!” श्रीयुत ग्रेडी म्हणाले. पत्नीच्या हातात दोन बटाटे पाहून ते चक्रावले. “अगं खरंच, मी भांड्यात एकच बटाटा ठेवला होता.”
श्रीमती ग्रेडींनी स्मित केले. “भांड्यात केसांची एकच पिन पडली. मग आता मला भांड्यात दोन पिना मिळतील?” त्या पुन्हा भांड्यात वाकल्या आणि त्यांचा चेहरा फिका पडला. हात बाहेर काढले तेव्हा त्यांच्या हातात एक नाही तर दोन पिना होत्या. दोन्ही अगदी हुबेहूब सारख्या! “असं कसं होऊ शकतं ग्रेडी?” त्या पुटपुटल्या.

मग श्रीयुत ग्रेडी यांनी त्यातील एक पिन घेतली आणि भांड्यात टाकली. लगेच भांड्यात वाकून पाहिल्यावर त्यांना त्यात दोन पिना दिसल्या.

“आता माझ्याकडे एकाऐवजी तीन पिना आहेत!” श्रीमती ग्रेडी म्हणाल्या. त्या आनंदाने पिनांनी आपले केस नीटनेटके करू लागल्या.

श्रीयुत ग्रेडी म्हणाले, “अगं जरा विचार कर. नक्कीच, हे भांडे जादूचे आहे. यात एका बटाट्याचे दोन बटाटे आणि एका पिनच्या दोन पिना झाल्या. मग यात आपली मेणबत्ती टाकली तर....!”

श्रीमती ग्रेडी यांनी मेणबत्ती आणली आणि जादुच्या भांड्यात टाकली. मग त्यांनी भांड्यात हात घालून हुबेहूब सारख्या दोन मेणबत्त्या काढल्या. त्यातील जुनी कोणती आणि नवी कोणती, हे अजिबात ओळखता येत नव्हते.

मग श्रीयुत ग्रेडी यांनी त्यांचा कोट भांड्यात टाकला. भांड्यातून दोन कोट निघाले, अगदी पहिल्यासारखेच फाटलेले!

मग त्यांनी भांड्यात घोंगडी टाकली. भांड्यातून दोन घोंगड्या मिळाल्या. त्यांच्यावर मूळ घोंगडीसारखे अगदी त्याच जागांवर भोके होती.

श्रीमती ग्रेडी पतीला मिठी मारत म्हणाल्या, “चला, आपल्या दोघांच्या हिवाळ्याची सोय झाली.”



श्रीयुत ग्रेडी यांनी दोऩ् बटाटे घेऊन भांड्यात टाकले आणि भांड्यातून चार बटाटे काढले. मग त्यांनी हे चार बटाटे भांड्यात टाकले आणि आठ बाहेर काढले. त्यांनी हे आठ बटाटे भांड्यात टाकल्यावर त्यांना सोळा बटाटे मिळाले. थोड्याच वेळात त्यांच्याकडे मेजवानी देता येईल इतके बटाटे जमा झाले.

श्रीमती ग्रेडी यांनी केसांच्या नवीन पिनांचा संच बनवला आणि हिवाळ्यातील काळोख्या रात्री पुरेसा प्रकाश मिळण्याइतपत मेणबत्त्याही मिळवल्या.

मग श्रीयुत ग्रेडी यांनी भांड्यात खुर्ची टाकायचा प्रयत्न केला, पण खुर्ची भांड्यात मावली नाही. ते म्हणाले, "हरकत नाही. आम्ही कित्येक वर्षे एकच खुर्ची वापरत आहोत."

पण श्रीमती ग्रेडी हुशार होत्या. त्यांनी काही विचार केला. त्या गादीवर जाऊन बसल्या आणि त्यांनी थरथरत्या बोटांनी गादीखालचे नाणे काढले.

"अहो, हे भांड्यात टाकले तर! याच्यावरसुद्धा जादू चालेल?'

श्वास रोखून त्यांनी नाणे भांड्यात टाकले. एका नाण्याची दोन नाणी झाली! मग दोन नाण्यांची चार, चाराची आठ, आठाची सोळा झाली आणि थोड्याच वेळात फरशी सोन्याच्या तेजस्वी नाण्यांनी झाकली गेली.

श्रीयुत ग्रेडी यांनी बरीच नाणी आपल्या खिशात टाकली. "अगं, मी गावात जातो. तुझ्यासाठी एक नवा कोट, नवी घोंगडी आणि नवी खुर्ची विकत आणतो."

श्रीमती ग्रेडी यांनी पतीला हो म्हटले. त्यांनी बटाटे एका पोत्यात भरले आणि नाणी गोळा करून गादीखाली ठेवली. मग त्या बाहेर गेल्या. तिथे त्यांना ओसाड आणि खडकाळ जमिनीत एक फूल उगवलेले दिसले. काही क्षणातच, त्यांच्या हातात फुलांचा गुच्छ दिसू लागला.

दिवसभर उत्तेजीत अवस्थेत राहिल्यामुळे श्रीमती ग्रेडीं थकून गेल्या. मग स्वत:ला दोन घोंगड्यांमध्ये लपेटून त्या झोपी गेल्या. पतीच्या प्रसन्न शीळेने त्या जाग्या झाल्या. श्रीयुत ग्रेडी दारातून आत आले तेव्हा त्यांच्या दोन्ही हातांत सामानाच्या पिशव्या होत्या.

पतीने काय आणले, हे पाहायला श्रीमती ग्रेडी लगबगीने धावल्या. पण धावताना त्या अडखळल्या आणि धप्पकन जाऊन पडल्या, थेट जादुच्या भांड्यात!

“वाचवा, मला बाहे काढा!” त्या किंचाळू लागल्या.

श्रीयुत ग्रेडी हातातील सामान भिरकावून भांड्याकडे धावले. त्यांच्या पत्नीच्या बारीक टांगा भांड्याच्या बाहेर होत्या. त्या जोरजोरात लाथा मारत होत्या.

श्रीयुत ग्रेडी यांनी पत्नीचे पाय घट्ट पकडले आणि गरीब बिचाऱ्या श्रीमती ग्रेडीला भांड्यातून बाहेर काढून हळुवारपणे फरशीवर उभे केले.

पण आता भांड्यातून आणखी दोन बारीक टांगा बाहेर आल्या. त्यासुद्धा लाथा झाडू लागल्या. काहीही विचार न करता श्रीयुत ग्रेडी यांनी ते पाय घट्ट पकडून बाहेर काढले....आणखी एक श्रीमती ग्रेडी! हुबेहूब त्यांच्या पत्नीसारखीच! श्रीयुत ग्रेडी यांना दोघांमध्ये काहीच फरक जाणवला नाही.

“हे काय? मला एकच पत्नी पुरेशी आहे,” ते थकल्या स्वरात म्हणाले.

पहिल्या श्रीमती ग्रेडी या धक्क्यातून सावरल्यावर हसत हसत म्हणाल्या, “यावर आता एकच उपाय आहे.”

श्रीयुत ग्रेडी दुसऱ्या श्रीमती ग्रेडींकडे बोट दाखवून म्हणाले, “तिला परत भांड्यामध्ये टाकूया?”

“अजिबात नाही,” पहिल्या श्रीमती ग्रेडी म्हणाल्या, “आता तुम्हाला, म्हणजे माझ्या पतीलाच भांड्यामध्ये उडी घ्यावी लागेल.”

“भांड्यामध्ये उडी घेऊ! मग मीसुद्धा दोन-दोन होईन.”

“एकदम बरोबर,” पहिल्या श्रीमती ग्रेडी म्हणाल्या. “मग प्रत्येक पतीसाठी पत्नी आणि प्रत्येक पत्नीला पती मिळेल,” त्या खुश होऊन पुढे म्हणाल्या, “सगळ्यात महत्त्वाचं हे की तुम्हाला एक मित्र मिळेल आणि मलासुद्धा!”

श्रीयुत ग्रेडींनी थोडा विचार केला. एक दिर्घ श्वास घेऊन त्यांनी भांड्यात उडी घेतली. त्यांचे जुनाट फाटलेले बूट भांड्याबाहेर दिसू लागले.

मग दोन्ही श्रीमती ग्रेडींनी ते बूट पकडून श्रीयुत ग्रेडी यांना बाहेर खेचले.

श्रीयुत ग्रेडी यांना बाहेर काढल्यावर भांड्याच्या बाहेर आणखी दोन बूट दिसू लागले. दोन्ही श्रीमती ग्रेडींनी ते बूट धरून बाहेर खेचले....आणखी एक श्रीयुत ग्रेडी बाहेर आले. दोन्ही श्रीयुत ग्रेडी हुबेहूब सारखे दिसत होते.

मग चारही ग्रेडींनी एकमेकांकडे पाहिले. आपण अगदी एकमेकांसारखे आहोत, हे त्यांना जाणवले. आपण चांगले मित्र आहोत, असे त्यांना वाटू लागले. पहिल्या ग्रेडी जोडप्याने मान्य केले की नवीन ग्रेडी जोडपेही छान होते.

साऱ्यांनी मेणबत्तीच्या उजेडात दोन-दोन बटाट्यांचे भोजन केले. दोन्ही श्रीमती ग्रेडी मुलांबद्दल आणि त्यांच्या कपड्यांबद्दल गप्पा मारू लागल्या. तर दोन्ही श्रीयुत ग्रेडी बटाट्याच्या पिकांवरील रोगांवर चर्चा करू लागले. त्यानंतर पहिल्या श्रीमती ग्रेडी त्या विशाल भांड्याला कवेत घेऊन म्हणाल्या, “आभार.” मग त्या इतरांना म्हणाल्या, “आपल्याला हवं ते सारं मिळालंय. आता हे भाडं जमिनीत पुरून टाकू. म्हणजे दुसऱ्या कुणालातरी ते सापडेल.”

त्यांनी भांडे जमिनीत पुरले. त्या दिवसापासून दोन्ही ग्रेडी जोडपी आनंदाने एकमेकांसोबत राहू लागली. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे, त्यांच्या आयुष्याला आनंदाचे भरते आले.

समाप्त